|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.उमवि/५/नुतनी/नै.वि.२०१८-१९/ डी.ओ. 8 / 172 /२०१८ दिनांक : 18-05-2018

प्रति,

मा. प्राचार्य/मा.संचालक
आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे बापूसाहेब डी डी विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालय वलवाडी-धुळे
ता. धुळे जि. धुळे

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास मान्यतेबाबत

संदर्भ :- १) आपल्या महाविद्यालयाने / परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरणासाठी [Continuation of Affiliation] सादर केलेला प्रस्ताव

२) विद्यापीठाद्वारे पत्र क्रमांक NMU/05/ Nutani-NG-2018-19/D.O. 8 / 40 / 2018 दि. 02-02-2018 रोजी नियुक्त करण्यात आलेली स्थानिक चौकशी समिती

महोदय /महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास मान्यता मिळणेकरिता आपण विद्यापीठास संदर्भिय पत्र क्रमांक ०१ नुसार सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयासंदर्भात/मान्यताप्राप्त परिसंस्थेसंदर्भात तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारे संदर्भिय पत्र क्रमांक ०२ अन्वये स्थानिक तपासणी समितीची नियुक्त करण्यात आली होती.

सदर स्थानिक तपासणी समितीने आपल्या महाविद्यालयास/मान्यताप्राप्त परिसंस्थेस भेट देवून विद्यापीठास सादर केलेल्या अहवालाची, प्राप्त आदेशान्वये, मा. अधिष्ठाता / मंडळाने छाननी व तपासणी करून संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार व विद्यार्थी प्रवेशा संदर्भात शिफारशी करून मा. विद्यापरिषदेस अहवाल सादर केला असून, सदर अहवालास मा. कुलगुरू महोदयांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने, सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या विषय/अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास [ Continuation of Affiliation / Natural Growth ] त्यासमोर दर्शविलेल्या कालावधीकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम,२०१६ चे कलम ११४(१) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

वरील अनुषंगाने आपणास विदीत करण्यात येते की, <u>N.C.T.E. Norms & Standards</u>, 2014 नुसार आवश्यक बाबींची पूर्तता करणे आपणास बंधनकारक राहील तसेच अनुषंगिक ज्या-त्या प्राधिकरणाची देखील मान्यता घेणे आवश्यक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

आपल्या महाविद्यालयास देण्यात येत असलेली मान्यता ही फक्त एका शैक्षणिक वर्षाकरिता म्हणजेच, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता देण्यात येत असून सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आपणांस बंधनकारक राहील.

आपणास असेही विदीत करणेत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०८ नुसार संलग्नीकरणासाठी विद्यापीठाने सूचित केलेल्या अटी/त्रुटींची पूर्तता करणे आपणास बंधनकारक असून, त्याअनुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयासंदर्भात / मान्यताप्राप्त परिसंस्थेससंदर्भात नमूद केलेल्या अटी/त्रुटीचे अवलोकन करून सदरच्या अटी/त्रुटींची परिपूर्ण स्वरूपात पूर्तता करावी व आवश्यक त्या कागदपत्रांसह अटीपूर्तता अहवाल ०३ महिन्यात, तथापि, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव सादर करणेपूर्वी विद्यापीठाच्या संलग्नता विभागास सादर होईल अशा बेताने पाठवावा. आपण सदर मुदतीत अटी-पूर्तता अहवाल सादर न केल्यास, आपल्या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिताचे कोणतेही प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाहीत व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

आपल्या महाविद्यालयात प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक व ५०% शिक्षक या अटींची पूर्तता होत नसेल अशा महाविद्यालयांनी संबधित रिक्त पदे ३ महिन्यात भरण्यात येतील अशा आशयाचे रु. १००/- च्या गैरन्यायिक स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करण्याच्या अटीवर शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीत संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारास विद्यार्थी प्रवेशासह मान्यता देण्यात येत आहे.

तथापि, ज्या महाविद्यालयांना सोबतच्या तक्त्यात प्रथम वर्ष व/थेट द्वितीय वर्षाकरीता No Admission असे नमूद केलेले असेल अशा महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता फक्त संलग्नीकरणाचे नुतनीकरणास/नैसर्गिक विस्तारास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अशा महाविद्यालयांनी प्रथम वर्षासाठी आणि थेट द्वितीय वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नयेत. तथापि, अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक व शिक्षक नियुक्तीसंदर्भात आणि स्थानिक चौकशी समितीने नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याबाबत रू. १००/- च्या गैरन्यायिक स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले हमीपत्र सादर करण्यासह, रिक्त पदांच्या नियुक्तीसाठी पुरेसे प्रयत्न केल्याबाबतचे अनुषंगिक दस्तऐवज सादर केल्यास व त्यास अनुसरून विद्यार्थी प्रवेशास परवानगी मिळणेसदर्भात विद्यापीठास प्रस्ताव सादर केल्यास विद्यार्थी प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल. मात्र विद्यापीठाच्या अंतिम मान्यतेनतरच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे आहे.

तसेच ज्या संबधीत महाविद्यालयांच्या केसेस अद्याप मे. कोर्टात प्रलंबीत आहेत, अशा महाविद्यालयाच्या बाबतीत मे. कोर्टाच्या आदेशाच्या अधीन राहून कार्यवाही करण्यात येईल, याचीही कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

तरी उपरोक्तबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, हि विनती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

(ग. मा. पवार)
उपकुलसचिव
संलग्नता विभाग

सोबत :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता नुतनीकरणाचा तक्ता.

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-

१) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२) मा. विभागीय संचालक, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, मानस भवन, श्यामला हिल्स, भोपाळ-०२
३) मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१
४) मा. सह संचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालय, जळगांव
५) मा. संगणक विभाग प्रमुख, संगणक विभाग, उ.म.वि., जळगांव
६) मा. सहा. कुलसचिव, प्रवेश पात्रता व अभ्यासमंडळ विभाग, उमवि, जळगांव
७) मा. समन्वयक, ई सुविधा केंद्र, उमवि, जळगांव

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-

१) मा.परीक्षानियंत्रक, उ.म.वि., जळगांव.
२) मा.उप/सहा.कुलसचिव, संबंधितविद्याशाखा, परीक्षाविभाग, उ.म.वि.जळगांव

Principal
Adarsh Shikshan Prasarak Mandal's
Bapusaheb ... College of Education
Walwadi, Tal.Dist.Dhule

जा.क्र. उमवि/५/नुतनी/नै.वि.२०१८-१९/ डी.ओ. 8/ 172/२०१८, दिनांक : 18-05-2018 चे सहपत्र
शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचा तक्ता

| Name of College / Recognized Institute | Details of Additional Division for Nutanikaran for A.Y 2018-19 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Nutanikaran for A.Y 2018-19 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Natural Growth for A.Y 2018-19 [As per Proposal] | A] Observations of Present LIC<br>B] Conditions of Previous LIC<br>C] Conditions of Present LIC | Approval of University to Continuation of Affiliation for A.Y.2018-19 |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| [E200101] - ADRSH SHIKSHAN PRASARAK MANDALS BAPUSAHEB D D VISPUTE COLLEGE OF EDUCATION VALWADI-DHULE Tal. Dhule Dist. Dhule | | B.ED. (GENERAL) - First Year - All Compulsory Subjects - 100<br>B.ED. (GENERAL) - Second Year - All Compulsory Subjects - 100 | | A] The college has its own building. Infrastructure of college is well. College environment is healty. R.O. system for drinking water faciltiy is available. As per syllabus sufficient books are available in the library. Science laboratory is well equiped. College has computer laboratory. The record of practical work of students is kept properly<br>B] --<br>C] 1.Regular principal should be appointed 2.Regular librarian should be appointed 3.Assistant professors should be appointed as per norms and rules of NCTE and state government of Maharashtra 4.College should make provision of EPF facility for the staff. | Continuation of Affiliation has been granted for Academic Year 2018-19, subject to fulfillment of the things as mentioned in the letter and in Column No. 05 of the chart within 03 months, however, preferably before submitting the proposals of Affiliation for A.Y. 2019-20. |

(ग.ज्ञा. पवार)
उपकुलसचिव
संलग्नता विभाग

Principal
Adarsh Shikshan Prasarak Mandal's
Bapusaheb D.D.Vispute College of Education
Walwadi,Tal.Dist.Dhule